एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता व सोयी सुविधा: एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाअंतर्गत

शिक्षणशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी

सादर संशोधन आराखडा

संशोधक

उज्वला सिताराम डामसे

मार्गदर्शक

डॉ. गिणगिणे अशोक पा.

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड, महाराष्ट्र.

जुलै २०२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	घटक	पान क्र.
1	प्रस्तावना	2
2	संशोधन समस्या विधान	5
3	संशोधन विषयाचे महत्व	6
4	संशोधनाची उद्दिष्टे	7
5	कार्यात्मक व्याख्या	8
6	संबंधीत संशोधनाचा आढावा	9
7	संशोधन व्याप्ती	15
8	संशोधनाच्या मर्यादा	16
9	संशोधनाची परिमर्यादा	16
10	संशोधन पद्धती	16
11	न्यादर्शन	17
12	माहीतीचे संकलन साधने	18
13	संख्याशास्त्रीय साधने	18
14	प्रकरणीकरण	19
15	कालावधी	19
16	संदर्भसूची	20

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता व सोयी सुविधा: एक अभ्यास

प्रस्तावना

आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन १९७२ मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचलनालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८३ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणाकरिता सन १९९२ मध्ये आदिवासी विकास संचलनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीन करण्यात आले. आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे चार अपर आयुक्त व २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असून त्यांच्या मार्फत मागासवर्गीय कल्याणाच्या राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांतर्गत सामाजिक कल्याण, आर्थिक कल्याण, शिक्षणामध्ये प्रगती, सामाजिक न्याय, महिला व बाल विकास, आरोग्य, पोषण, रोजगार इ. बाबतच्या योजना राबविण्यात येतात.

मराठवाड्यामध्ये आदिवासी विकास विभाग अमरावती अंतर्गत एकूण तीन प्रकल्प येतात त्यामध्ये औरंगाबाद, कळमनुरी व किनवट यांचा समावेश होतो औरंगाबाद प्रकल्पामध्ये 8 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 2085 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कळमनुरी प्रकल्पामध्ये 5 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 1805 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व किनवट प्रकल्पामध्ये 16 शासकीय

आश्रम शाळा आहेत त्यामधून सुमारे 5497 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. अशा एकूण तिन प्रकल्पामध्ये 24 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 9387 विद्यार्थी शिकत आहेत.

कोठारी शिक्षण आयोगाने 1964 - 66 सध्याच्या शैक्षणिक कार्यक्रमातील उणिवा दूर करून ते कार्यक्रम जिननाभिमुख करावयास पाहिजे असे म्हटले म्हणजेच, प्रयोगशाळा किडा साहित्य सोय व सुविधा वस्तीग्रह सुधारले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांचे सर्वसामान्य कल्याण साधनांसाठी आरोग्य सेवा व्यवसाय मार्गदर्शन याबरोबर शैक्षणिक, कला, मनोरंजन व खेळाविषयी च्या सुविधा भरपूर प्रमाणात उपलब्ध करावयास पाहिजे सन 1966 - 67 मध्ये केंद्र सरकारने त्रिगुण सेन समिती नेमणूक करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विषयक समस्यांची उकल करण्यासाठी निष्णात, पारंगत व प्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणुका यावर भर दिला सन 1969 मध्ये विद्यार्थी प्रतिनिधीच्या परिषदेत विविध अभ्यासेतर कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या सहभाग वाढविण्यावर भर द्यावा असा उपाय सुचवला आहे.

आधुनिक काळात शिक्षण क्षेत्राला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शारीरिक शिक्षण क्षेत्राचा झपाट्याने प्रसार व प्रचार होताना दिसून येत आहे. आज जगातील शारीरिक शिक्षण क्षेत्राचा अभ्यास केल्यास भारताच्या तुलनेत पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये शैक्षणिक क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. काही देशांमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे शिक्षण म्हणून घोषित केले आहे. राष्ट्राचे भावी आधारस्तंभ म्हणून नवजात बालकांसाठी बघितले जाते बालपणी त्यांचे योग्य पालन पोषण करून एक आदर्श नागरिक बनवण्यासाठी काही राष्ट्र सतत धडपडत असताना दिसून येतात. अनेक राष्ट्रांमध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये सुसज्ज क्रिडांगण विविध शैक्षणिक सुविधा आणि अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य या बाबींना अतिशय महत्त्व देण्यात आले आहे. त्यांच्या तुलनेत भारताचा विचार केल्यास आपल्याकडील सुसज्ज क्रिडांगण विविध शैक्षणिक सुविधा आणि अत्याधुनिक शैक्षणिक साहित्याची उणीव प्रकर्षाने जाणताना दिसून

येते भारतात उपरोक्त सुविधा अत्यंत अल्प प्रमाणात आढळून येतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी अत्यंत निराशाजनकच आहे हे स्पष्ट दिसून येते.

प्रामुख्याने मराठवाडा विभाग पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मागास क्षेत्र म्हणून ओळखले जाते. विशेषता 1990 नंतर शैक्षणिक दृष्ट्या जरी परिवर्तनाचा आलेख वाढला असला तरी शैक्षणिक क्षेत्रात म्हणावे अशी परिवर्तन व सुधारणा झालेली आढळत नाही. खो-खो, कबड्डी, व्हॉलिबॉल, क्रिकेट, धावणे. पोहणे, वेटलिफ्टिंग यासारख्या शैक्षणिक प्रकारात सुधारणा किंवा प्रगती ही आढळत नाही. शहरी समुदाय अपेक्षा ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात शैक्षणिकविषयक सोयीसुविधांच्या अभावामुळे उदयोन्मुख खेळाडूंना अनुकूलता मिळत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कलागुण, बौद्धिक क्षमता आहे. त्यांना जर योग्य संधी व सुविधा मिळाल्या तर ते त्यांच्यातील शैक्षणिक गुणांचा विकास होऊ शकतो.आदिवासींमध्ये खेळाचा गुण उपजत असल्याने या क्षेत्रात आदिवासी खेळाडू मोठी झेप घेऊ शकतात. लिंबाराम, कविता राऊत, हिमा दास ही त्याची उदाहरणे आहेत. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात आदिवासी आश्रम शाळा यांना मिळणारा शैक्षणिक अनुदानाचा पर्याप्त वापर होतो काय शैक्षणिकप्रकार व खेळाविषयी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक यांचा दृष्टिकोन काय आहे याविषयी संबंधित माहितीचे संकलन त्याआधारे वस्तुनिष्ठ संशोधनाद्वारे अचूक निष्कर्ष कडे पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहे. प्रस्तुत संशोधनात खेळाडूची किडा संपादणूक व शैक्षणिकविषयक सोयीसुविधा चा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन समस्या

मराठवाड्यातील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेतील शैक्षणिक सुविधा पुरेशा आहे काय? अनुदानाचा पर्याप्त वापर होतो काय? विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक यांचा दृष्टिकोन काय आहे?तसेच शैक्षणिक सुविधा संपादनावर नेमका कसा परिणाम

होतो ? असे अनेक प्रश्न एक शैक्षणिक या विषयाचा विद्यार्थी म्हणून माझ्या मनात निर्माण होतात .या सर्व प्रश्नांचे उत्तर शोधावे व या आश्रम शाळांचा शैक्षणिक विषयक दर्जा सुधारण्यासाठी शासनास कांही ठोस उपाय योजना सुचवता याव्यात जेणेकरून या शाळेतील शैक्षणिक संपादणूक व सोयी सुविधाशी संबंधित समस्या दूर होतील .म्हणून संशोधकाने संशोधनासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता व सोयी सुविधा: एक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन समस्येचे गरज व महत्त्व –

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून खालील बाबी स्पष्ट होतील म्हणून हे संशोधन महत्वाचे वाटते .

- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्याशासकीय आश्रम शाळेतील शैक्षणिक सुविधांचा व शैक्षणिक संपादनाचा दर्जा जाणून घेण्याच्या अनुषघाने हे संशोधन महत्वाचे आहे.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेत किती प्रमाणात शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत ते या संशोधनातून स्पष्ट होईल म्हणून हे संशोधन कार्य महत्वाचे आहे.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेत शैक्षणिक अनुदानाचा वापर कश्याप्रकारे होतो हे या संशोधनातून स्पष्ट होईल .

- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेत खेळाविषयी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक यांचा दृष्टिकोन कसा आहे ते या संशोधनातून स्पष्ट होईल.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेत शैक्षणिक सुविधा अभावी व उपलब्धतेमुळे शैक्षणिक स्पर्धा संपादनावर होणारा परिणाम या संशोधनातून स्पष्ट होईल.

संशोधनाची उद्दिष्टये

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक व शैक्षणिकविषयक सोयीसुविधा या विषयावरील संशोधन खालील उद्दिष्टाना प्रमाण माणून करण्याचा मानस आहे.

1. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळांची प्रशासकीय माहिती मिळविणे.
2. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळांच्या शैक्षणिक विषयक उपक्रमांचा अभ्यास करणे
3. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळांच्या भौतिक सुविधांचा अभ्यास करणे.
4. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळांच्या शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे
5. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेतील अध्यापन पद्धतीचा अभ्यास करणे.

6. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळांच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा अभ्यास करणे.
7. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेतील शिक्षक यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

कार्यात्मक व्याख्या :

१) मराठवाडा

मराठवाडा हा एक महाराष्ट्रातील भौगोलिक प्रदेश आहे.ज्यात एकूण आठ जिल्ह्याचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील नांदेड ,हिंगोली व औरंगाबाद जिल्ह्यातील किनवट,कळमनुरी व औरंगाबाद तालुक्यातील शाळांचा समावेश केला आहे.

२) नांदेड जिल्हा

नांदेड जिल्ह्या हा महाराष्ट्रातील एक भौगोलिक प्रदेश आहे , ज्यात एकूण १६ तालुक्यांचा समावेश होतो.

३) विकास प्रकल्प

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती करण्यासाठी ज्या अदिवासी विभागामार्फत शाळांच्या सोयीसुविधाच्या विकासाचा आराखडा योजला जातो, अशा प्रकल्पास विकास प्रकल्प म्हटले जाते.

ऑक्सफोर्ड शब्दकोशानुसार विकास ही अधिक मोठे होण्याची,अधिक सामर्थ्यवान होण्याची,अधिक चांगले होण्याची प्रक्रिया आहे किंवा कांहीतरी असे करण्याची प्रक्रिया आहे.

4) शैक्षणिक गुणवत्ता

अदिवासी विकास प्रकल्प विभागामार्फत ठरवुन दिलेल्या शाळांनी शैक्षणिक विकासाचे निकष पुर्ण करणे म्हणजेच शैक्षणिक गुणवत्ता होय.

5) सोयी सुविधा

अदिवासी विकास प्रकल्प विभागामार्फत शाळांना ठरवुन दिलेल्या सेवा सुविधा.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

पुर्व संशोधनाने अभ्यासाची व्याप्ती, मर्यादा आणि सीमांकन आणि सध्याच्या अभ्यासासाठी नमुना, साधन आणि सांख्यिकी तंत्र निवडण्यासाठी संशोधकाला मार्गदर्शक तत्त्वे देतात. केवळ संशोधन कार्याशी संबंधित असलेल्या पुनरावलोकनामुळे संशोधन करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यात आणि पुढे जाण्यासाठी उपाय शोधण्यात खूप मदत होईल. मुख्य घटकावर आधारित विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या अंतर्गत झालेली संशोधने अभ्यासावयास मिळाली. त्यामुळे संशोधनाला नेमकी दिशा देण्यात मदत मिळेल.

पी.डब्ल्यू.किरपाल १९६१ : " Education in India volume 1st "१९६१ मध्ये किरपाल यानी संपूर्ण भारतातील शारीरिक शिक्षणाचा गतिविधि चे अध्ययन केले.आपल्या अभ्यासा मध्ये त्यांना असे आले की, खेळ व शारीरिक शिक्षण क्षेत्रात व प्रशिक्षण उपयुक्त शैक्षणिक सुविधा अभावामुळे या कडे पाहण्याचा दृष्टिकोण सकारात्मक नव्हता. त्यांच्या

प्रबंधात त्यांनी नेताजी सुभाष National Institute of Sports एथे प्रशिक्षणार्थी ना उपयुक्त सुविधा प्राप्त करून देन्या करिता बहुमूल्य सूचना केलेल्या आहेत.

भगत केशव १९८५; यानी द सर्वे ऑफ स्पोर्ट्स लिटरेचर बुक अवेलेबल इन लॉ कॉलेज ऑफ अमरावती यूनिवर्सिटी या विषयावर संशोधन केले आणि अमरावती विद्यापीठात प्रबंध सादर केला. या संशोधना साठी अमरावतीतील एकूण १२ महाविद्यालये निवडली गेली. संशोधना साठी प्रश्नावली, मुलाखत प्रत्यक्ष भेटी घेवुन माहिती मिळवली. निष्कर्षातून असे आढळून आले की, महाविद्यालयत शारीरिक शिक्षण व खेळा ची पुस्तकें कमी प्रमाणात आढळून आली. शैक्षणिक आणि शारीरिक शिक्षण संबंधित साहित्य व ग्रंथ खरेदी साठी उदासीनवादी धोरण दिसुन आले.

कोठारी कमीशन १९६४ : शारीरिक शिक्षणाचा विकास विकास करण्यासाठी शासनाने कोठारी कमीशन नेमले. शारीरिक शिक्षण मध्ये अडचणी येऊ लागल्या. शिक्षणशास्त्र, गणित व अन्य विषयाचे स्थान याबाबत अभ्यास करून डॉ. डी.एस कोठारी यांनी कोठारी कमीशन शैक्षणिक प्रश्नाबाबत केंद्र शासनाला अहवाल सादर केला. कोठारी कमीशन १९६३-१९६४ मध्ये पूर्ण झाले. कोठारी कमीशन शारीरिक शिक्षा बाबत खाली शिफारशी आहेत.

१. विद्यार्थ्यांचे व त्यांची शारीरिक क्षमता लक्षात घेवुन शारीरिक शिक्षण कार्यक्रमाची आखणी करावी.

२. शैक्षणिक संस्थान मध्ये शारीरिक शिक्षणाचे नियोजन करित असताना आर्थिक स्तरांचा विचार करावा.

३. शैक्षणिक विकासाची व्याप्ति वाढवावी.

४. इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शारीरिक शिक्षणाचा कार्यक्रम मुलां-मुलींना समान आसावा.

५. शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, सहकार्य, नेतृत्व आदि गुणांना चालना देण्यात यावी.

६. देशी खेळांची जपवणुक राष्ट्रीय परंपरा म्हणून करावी.

महेश प्रसाद १९८७: यांनी अमरावती विद्यापीठ मध्ये कंपैरेटिव स्टडी ऑफ़ द फिजिकल फैसिलिटी एक्जिस्टिंग इन द गवर्नमेंट एंड नॉन गवर्नमेंट सेकेंडरी स्कूल ऑफ गया डिस्ट्रिक्ट बिहार या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. त्यांनी संशोधनासाठी माहिती चे संकलन बिहार मधील गया जिल्हाच्या दहा शासकीय आणि अशासकीय माध्यमिक शाळा निवडल्या. निष्कर्षामध्ये त्यांना खेळा चे मैदान ,शैक्षणिक, साहित्य ,क्रीडांगणाची स्थिति, आवश्यक कर्मचारी वर्ग ,शैक्षणिक स्पर्धेतून संपादन इत्यादि बाबी शासकीय माध्यमिक शाळांच्या तुलनेत अशासकीय शाळांमध्ये चांगले आढळुन आले.

के राधाकृष्णन १९७३: यांनी मधुराई विद्यापीठात सर्वे ऑफ फिजिकल एजुकेशन फैसिलिटी इन आर्ट एंड साइंस कॉलेज इन कृष्ण डिस्टिक आंध्र प्रदेश या विषयावर प्रबंध सादर केला.हे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी त्यांनी मुलाखती, प्रश्नावली या दोन पद्धतींचा अवलंब केला. प्रश्नावली तयार करताना त्यांनी खालील मुद्दांवर अधिकचा भर दिला.

१ .शैक्षणिक साहित्य व सामग्री.

२ .मनोरंजनाची साधने

३ . विविध खेळांची क्रीडांगणे मैदाने.

४ .ग्रंथालय व वाचनालय

५ .कायम स्वरूपी सुविधा

६ . नोंद वही.

आपला संशोधनाअंती त्यांनी असे निष्कर्ष काढले की , एका महाविद्यालयात खेळाचे मैदान उपलब्ध नव्हते, एका महाविद्यालयात जिम्नेशियम हॉल होता आणि एका महाविद्यालयात जिम्नेशियम होता आणि एका महाविद्यालयात शारीरिक शिक्षकांची नियुक्ति केलेली नव्हती. एका महाविद्यालयात शारीरिक शिक्षकांची नियुक्ति केलेली नव्हती.

१. कोठारी कमिशन :प्रा.डी.एस. कोठारी,माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अध्यक्षता खाली भारत सरकार ने 14 जुलै, 1964 मध्ये नेमलेले कमीशन.
२. .पी.डब्ल्यू.किरपाल: education in India volume I. ministry of education government of India New Delhi
३. महेश प्रसाद: comparative study of the physical facilities existing in the government and नॉन गवर्नमेंट secondary schools of गया डिस्ट्रिक्ट बिहार ओरिजिनल इन हिंदी अनपब्लिश मास्टर dissertation
४. K Radhakrishnan: a survey of physical education facilities in art and science college in Krishna District Andhra Pradesh thesis सबमिटेड टू द मदुराई यूनिवर्सिटी 1973 page number 106
५. भगत केशव: survey of sports literature(book) available in the college of Amravati University 1985 original in Hindi unpublished Masters dissertation

पोटे बी.एस.(2005) यांनी शिक्षण प्रशिक्षणार्थीच्या आरोग्य संबंधी शारीरिक तंदुरुस्ती मानसिक स्वास्थ व अध्यापन क्षमता यांचा सहसंबंधात्मक अभ्यास केला.त्यासाठी त्यांनी पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयातील 300 प्रशिक्षणार्थीची पुरुष यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श

निवड केली. निवडक शारीरिक तंदुरुस्ती घटकांचे कसोटी द्वारे मापन केले आगाशे व हेलेडे यांच्या (पेपर पेन्सिल) कसोटीद्वारे मानसिक स्वास्थ मोजले व अध्यापन क्षमता मापनासाठी विद्यापीठ परीक्षेच्या शेकडो गुणांचा वापर केला यावरून असे दिसून आले की की शिक्षण प्रशिक्षणार्थीचे मानसिक स्वास्थ,अध्यापन क्षमता तसेच आरोग्य संबंधित शारीरिक तंदुरुस्तीचे घटक व अध्यापन क्षमता त्यांच्यामध्ये धनात्मक सहसंबंध आहे परंतु आरोग्य संबंधित शारीरिक तंदुरुस्तीचे घटक व अध्यापन क्षमता यांच्यात ऋणात्मक संबंध आहे.

पोटे बी एस 2005 शिक्षण प्रशिक्षणार्थीच्या आरोग्यासंबंधी शारीरिक तंदुरुस्ती मानसिक स्वास्थ व अध्यापन क्षमता यांचा सहसंबंध आत्मक अभ्यास प्रकाशित एम. फिल. प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे.

आहेर श. शं. (2008). यांनी शालेय स्थूल मुलांच्या मानसिक आरोग्य, शैक्षणिक कामगिरी आणि शारीरिक सुदृढता या घटकांचा विश्लेषणात्मक सहसंबंधात्मक अभ्यास केला. संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला संशोधनाकरिता पुणे शहरातील 252 उच्च माध्यमिक शाळांपैकी 36 मराठी व इंग्रजी शाळेतून 11 ते 15 वयोगटातील 603 स्थूल विद्यार्थ्यांची बहुस्तरीय नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली त्यासाठी विद्यार्थ्यांवर निवड कसोट्या घेण्यात आल्या व आगाशे व हेलेडे यांची मानसिक आरोग्य शोध कसोटी घेऊन संशोधनासाठी गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, मध्यगा, प्रमाण विचलन या संख्याशास्त्र साधनांचा संशोधकाने वापर केला. यावरून असे निष्कर्ष निघाले की, स्थूल विद्यार्थ्यांची शैक्षणिक कार्यमान, मानसिक आरोग्य व चरबीचे प्रमाण यांचा सार्थक संबंध आढळला नाही. तर चरबीचे प्रमाण व आरोग्यधिष्टीत शारीरिक सुदृढता यांचा ऋणा व सार्थक संबंध आढळला.

आहेर श. शं. (2008). यांनी शालेय स्थूल मुलांच्या मानसिक आरोग्य, शैक्षणिक कामगिरी आणि शारीरिक सुदृढता या घटकांचा विश्लेषणात्मक सहसंबंधात्मक अभ्यास. प्रकाशित पी.एच.डी प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे.

भागीरथी, समीर यांनी स्पिनर व पेस बॉलर यांच्या शारीरिक घटक व शरीर मापन यांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यात त्यांनी स्पिनर व पेस बॉलर यांची शारीरिक घटक व शरीर मापन यांची तुलना करणे हे त्यांच्या अभ्यासाचे उद्दिष्ट होते. त्यात त्यांनी तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करून एम.एस.एन.आर.एस पटियाला येथील 10 राष्ट्रीय व विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झालेले पुरुष क्रिकेट खेळाडूंची 5-5 याप्रमाणे निवड केली. त्यानंतर त्यांनी शरीर मापनाच्या स्टॅंडिंग उंची, पायाचा घेर, मांडीचा घेर, यांचे मापन केले. तर पायाची ताकद व पाठीची ताकद, हाताची ताकद या शारीरिक घटकांचा तर घोट्याची लवचिकता, नितंबाची लवचिकता, खांद्याची लवचिकता या लवचिकतेच्या घटकावर त्याचप्रमाणे 50 मीटर धावणे या वेगक्षमतेच्या टेस्ट घेतल्या. त्यासाठी त्यांनी टी टेस्ट वापर केला यावरून असे लक्षात आले की, पाय, पाठ, हाताची ताकद यात सार्थक फरक आढळून आला तर नितंब घोटा व खांद्याच्या लवचिक ते फरक आढळला नाही.

भागीरथी, समीर, स्पिनर व पेस बॉलर यांच्या शारीरिक घटक व शरीर मापन यांचा तुलनात्मक अभ्यास, (अप्रकाशित लघुशोधनिबंध एम फिल (शारीरिक शिक्षण) पदवी पूर्ततेसाठी पुणे विद्यापीठ, पुणे)

कुमार, अजय (2001) यांच्या संशोधनाचे दक्षिण व उत्तर भारतातील केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांची शारीरिक मापन व शारीरिक तंदुरुस्ती यांचा तुलनात्मक अभ्यास करणे हे उद्दिष्ट होते. यासाठी त्यांनी तुलनात्मक पद्धतीचा वापर करत असताना रँडम सँपल पद्धतीचा वापर करून 13 व 14 या वयोगटातील प्रत्येकी 200 विद्यार्थी अशी एकूण 800 मुले केंद्रीय शाळेतील विद्यार्थ्यांची

निवड केली. त्यासाठी त्यांनी उंची ,वजन, नेक ग्रोथ, चेस्ट ग्रोथ, अप्पर आर्म ग्रोथ, काफ ग्रोथ, आर्म ग्रोथ, लेग लेन्थ या शारीरिक मापनाच्या टेस्ट तर पुल अप्स, सीट ॲप्स, शटल रन, स्टॅंडिंग ब्रॉड जम्प, 50 यार्ड डॅश, 600 यार्ड रन/वाक या शारीरिक तंदुरुस्तीच्या टेस्ट घेण्यात आल्या. यासाठी त्यांनी मध्यमान, प्रमाण विचलन, टी टेस्ट या सांख्यिकीचा वापर केला. यावरून असे लक्षात आले की, 13 व 14 वर्ष वयोगटातील केंद्रीय शाळेतील विद्यापीठाच्या शारीरिक तंदुरुस्ती व शरीर मापन यात फरक दिसून आला.

कुमार, अजय (2001) यांच्या संशोधनाचे दक्षिण व उत्तर भारतातील केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांची शारीरिक मापन व शारीरिक तंदुरुस्ती यांचा तुलनात्मक अभ्यास (अप्रकाशित लघुशोधनिबंध एम फिल (शारीरिक शिक्षण) पदवी पूर्ततेसाठी पुणे विद्यापीठ, पुणे)

उपरोक्त सर्व संशोधन हे शालेय ,विद्यापीठीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक विषयक सुविधा व अन्य शैक्षणिक बाबींशी निगडीत आहे.

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागा अंतर्गत येणाऱ्या आदिवासी शाळा व तेथील शैक्षणिक संपादणूक व शैक्षणिक सोयी सुविधावर आधारित आहे.

संशोधन व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती म्हणजेच त्याचा विस्तार होय.प्रस्तुत संशोधन विषयाचा विस्तार मराठवाडा व त्या अंतर्गत येणाऱ्या निवडक जिल्ह्यातील आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या शाळेतील शैक्षणिक संपादणूक व सोयी सुविधांशी संबंधित आहे.

संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती, सवयी आणि कौटुंबिक पार्श्वभूमी विचारात घेतली जानार नाही.

संशोधनाची परिमर्यादा-

सदर संशोधन हे पुढील घटकांशी परीमर्यादित असेल-

- सदर संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील शाळांची निवड करण्यात येईल.
- प्रस्तुत संशोधनात शैक्षणिक गुणवत्ता इ.चाच अभ्यास करण्यात येईल.
- प्रतुत संशोधनात निवडक भौतीक व शैक्षणिक सोयीसुविधांचाच विचार करण्यात येईल.
- प्रस्तुत संशोधनासाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२४ हा कालावधी अपेक्षित आहे.

संशोधनपद्धती

सदरील संशोधनात संशोधक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करेल. सर्वेक्षण पद्धतीमुळे वर्तमान काळातील परिस्थिती समजते त्याचबरोबर संबंधित विषयात मार्गदर्शन करण्यासाठी व त्यातील दोष निराकरणासाठी उपयोग होतो.संशोधकाला त्याच्या समस्येची उकल करण्यासाठी सर्वेक्षणाचा उपयोग होतो.अभ्यासाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने आधारभूत असलेल्या वर्तमान परिस्थितीचे सत्य आकलन होते.प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील वर्तमानकालीन परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धती(वर्णनात्मक)हा संशोधनाचा प्रकार आहे.वर्णनात्मक संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती,निरीक्षणे इत्यादी साधनांचा उपयोग करता येतो.

न्यादर्शन :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे, गरज, व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन संशोधनासाठी आवश्यक सामग्री संकलित करण्यासाठी शालेय सर्वेक्षण करणे आवश्यक आहे हे लक्षात आले. म्हणून सदरील संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्याचे ठरविले आहे.

नमुना निवड

प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यासाठी तथ्यांचे संकलन करणे आवश्यक असते.त्यासाठी मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली व औरंगाबाद या तीन जिल्ह्यातील किनवट ,कळमनुरी व औरंगाबाद या तालुक्यातील आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या शाळा संशोधनाचा मुख्य आशय आहे. त्यामध्ये औरंगाबाद, कळमनुरी व किनवट यांचा समावेश होतो .औरंगाबाद प्रकल्पामध्ये 8 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 2085 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कळमनुरी प्रकल्पामध्ये 5 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 1805 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व किनवट प्रकल्पामध्ये 16 शासकीय आश्रम शाळा आहेत त्यामधून सुमारे 5497 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. अशा एकूण तिन प्रकल्पामध्ये 24 शासकीय आश्रम शाळांमधून सुमारे 9387 विद्यार्थी शिकत आहेत.

त्यापैकी सर्वच शाळा नमुना निवडीसाठी निवड केली जाईल. या शाळेतील असलेले प्रत्येक शाळेतील एकूण मुख्यध्यापक , काही शिक्षक यांची प्रश्नावलीच्या माध्यमातून व मुलाखत घेतली जाईल व तथ्य संकलन केले जाईल.

शाळांची निवड- प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळांची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल.

माहीतीचे संकलन साधने :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माहीतीला अर्थ लावल्याशिवाय डेटा संकलनाला काही अर्थ नाही. कच्चा डेटा योग्य अर्थासाठी समजावून सांगणे अवघड असल्याने, डेटा गोळा केल्यानंतर त्याचे विश्लेषण करणे हे संशोधकाचे कर्तव्य आहे. माहीती विश्लेषणामध्ये इच्छित उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी व्याख्या करण्याच्या उद्देशाने माहीतीचे घटक भागांमध्ये क्रम किंवा व्यवस्था करणे समाविष्ट असते. तथापि, इच्छित उद्दिष्टांची उत्तरे मिळविण्यासाठी केवळ माहीती विश्लेषण पुरेसे नाही. विश्लेषणाच्या परिणामाचा अर्थ लावणे देखील आवश्यक आहे. हे निष्कर्ष काढते आणि स्वतःचे संशोधन आणि इतर संशोधनांचे निष्कर्ष किंवा सिद्धांताच्या अपेक्षा यांच्यातील संबंधांबद्दल निष्कर्ष काढते. या अभ्यासात माहीती करून गोळा करण्यात येईल.

शाळा, शिक्षक, पायाभूत सुविधा आणि विविध उपक्रमांची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल.

संख्याशास्त्रीय साधने :

सांख्यिकीय तंत्राद्वारे पद्धतशीरपणे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, टी चाचणी तसेच शेकडेवारी इ. चा वापर करण्यात येईल.

प्रकरणीकरण

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : मराठवाडा एक दृष्टीक्षेप

प्रकरण चौथे : मराठवाड्यातील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेची स्थिती व आव्हाने

प्रकरण पाचवे : मराठवाड्यातील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेतील शैक्षणिक संपादणूक व

शैक्षणिकविषयक सोयीसुविधा

प्रकरण सहावे : निष्कर्ष व सारांश

संशोधनासाठी लागणारा कालावधी

वर्ष १ ले	१ समस्या निश्चिती. २ पहिले आणि दुसरे प्रकरण.
वर्ष २ रे	प्रकरण तिसरे
वर्ष ३रे	प्रकरण चौथे व पाचवे

संदर्भ ग्रंथसुची:

बन्सी, बि.पं. (१९४१). *शिक्षणातील संशोधन अभिकल्प :* नुतन प्रकाशन, पुणे.

भिंताडे, वि.रा. (१९९९). *शैक्षणिक संशोधन पध्दती :* नित्य नुतन प्रकाशन, पुणे.

भोसले, कुंदा (1994). *माध्यमिक व उच्च मध्यमिक शिक्षणतील समस्या* नासिक प्रकाशन, नाशिक.

वीरकर, प्रतिभा (1984). *शालेय शिक्षणचे अधिष्ठान* द्वारका प्रकाशन, पुणे.

बापट, प्र ग (1987). *भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण* साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.

शिवणेक, ल मा. (1992). *माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती* नूतन प्रकाशन, पुणे.

पाटील, लीला (1980). *माध्यमिक शाळा –संचालन व संवर्धन* श्री विद्या प्रकाशन, पुणे.

पवार, ना ग (1991). *भारतीय शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह* नूतन प्रकाशन, पुणे.

दुनाखे, अरविंद (1998). *शालेय व्यवस्थापन, प्रशासन, व संघटन* नूतन प्रकाशन, पुणे.

पाटील, लीला व कुलकर्णी विश्वंभर (1990). *आजचे शिक्षण: आजच्या समस्या* श्री विद्या प्रकाशन, पुणे.

संशोधक
उज्वला सिताराम डामसे

मार्गदर्शक
डॉ. गिणगिणे अशोक पा.